**<u>संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १०४५/२०२२</u>**

**<u>निशाणी ३३</u>**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांचा जबाब शपथेवर सुरू</u>**

**माझे नांव –** संजय जालंदर बुवा.

**वय** – ४८ **वर्षे,** **व्यवसाय –** कृषी अधिकारी, वाळवा पंचायत समिती, ईश्वरपूर.

**रा.** ईश्वरपूर **ता.** वाळवा, **जि.** सांगली.

**<u>सरतपासणी अभियोग पक्षातर्फे श्री. एस. बी. जाधव सहा. सरकारी अभियोक्ता यांचेतर्फे</u>**

सन २०२१–२०२२ मध्ये मी वाळवा पंचायत समिती, इस्लामपूर येथे कृषी अधिकारी म्हणून कार्यरत होतो. फेब्रुवारी २०२२ मध्ये माझ्याकडे गुणवत्ता नियत्रंण निरिक्षक या पदाचा पदभार आला होता. सन नोव्हेंबर २०२० पासून फेब्रुवारी २०२२ पर्यंत अमोल कोळी यांच्याकडे गुणवत्ता नियत्रंण निरीक्षक या पदाचा पदभार होता. गुणवत्ता नियत्रंण निरीक्षक यांचेकडे खताची गुणवत्ता तपासण्याचे कामकाज असते.

२. दिनांक १२/०१/२०२१ रोजी अमोल कोळी यांनी महालक्ष्मी कृषी सेवा केंद्र गोटखिंडी येथे कृषी निविष्ठा विक्री केंद्र येथे तपासणीसाठी गेले असता त्यांनी १५:१५:१५ (एन.पी.के) या खताचे नमुने घेतले. घेतलेल्या नमून्यापैकी एक नमुना कोल्हापूर येथील शासकीय प्रयोग शाळेत तपासणीसाठी पाठविला होता. त्यापैकी एक नमूना कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांचे कस्टडीमध्ये पाठविला व एक नमुना महालक्ष्मी कृषी सेवा केंद्र यांचेकडे ठेवला.

३. त्यानंतर दिनांक २७/०१/२०२१ रोजी शासकीय प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त झाला. अहवालानुसार सदर खताचा नमुना अप्रमाणित असल्याचे घोषीत करण्यात

आले. त्यानंतर दिनांक ०१/०२/२०२१ रोजी खत उत्पादक कंपनी आर.सी.एफ, मुंबई व खत विक्रेते महालक्ष्मी कृषी सेवा केंद्र गोटखिंडी यांना कारणे दाखवा नोटीस पाठविली. त्यानंतर दिनांक ३०/१२/२०२१ रोजी जॉईंट डायरेक्टर ऑफ अग्रीकल्चर, कोल्हापूर यांचेकडून पत्र प्राप्त झाले. सदर पत्रासोबत प्रयोगशाळेचा अहवाल होता. सदर अहवालामध्ये पुनर्विश्लेषणासाठी पाठविण्यात आलेला खताचा नमुना अप्रमाणित असल्याचे कळविले.

४. त्यानंतर दिनांक ३१/०३/२०२२ रोजी अप्रमाणीत आलेल्या खत नमुन्यावर कोर्ट केस दाखल करण्यासाठी कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद सांगली यांचेकडे पूर्व परवानगी मिळणेबाबत मी पत्र पाठविले होते. आता मला सदर पत्राची मुळ प्रत दाखविली, ती तीच असून त्यावर माझी सही आहे व त्यातील मजकूर सत्य व बरोबर आहे (त्यास **निशाणी ३४** देण्यात येते). दिनांक १३/०६/२०२२ रोजी कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद सांगली यांचेकडून पूर्व समंत्ती प्राप्त झाली. आता मला सदर पूर्व समंत्ती आदेशाची मुळ प्रत दाखविली, ती तीच असून त्यावर कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांची सही आहे व त्यातील मजकूर सत्य व बरोबर आहे (त्यास **निशाणी ३५** देण्यात येते). त्यानंतर दिनांक ०२/०८/२०२२ रोजी केस दाखल केली. आता मला तक्रार अर्ज दाखविला, तो तोच असून त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर सत्य व बरोबर आहे (त्यास **निशाणी ३६** देण्यात येते).

५. प्रयोगशाळेचा अहवाल मी तक्रार अर्जासोबत जोडला आहे. आता मला सदर अहवाल दाखविला, तो तोच आहे (त्यास **निशाणी ३७** देण्यात येते). आरोपींना पाहिल्यास मी ओळखू शकतो. आज न्यायदालनात आरोपी क्र. १ हजर आहे. आरोपी क्र. २ न्यायदालनात दिसत नाही.

**<u>उलटतपासणी आरोपी क्र. १ तर्फे श्री. आर. के. खोत विधीज्ञ.</u>**

६. वातावरण बदलामुळे किंवा नमुना पाठविण्यास विलंब झाल्यास अहवालामध्ये फरक येवू शकतो, याबाबत मला सांगता येत नाही. नमूना घेताना पंचनामा केला अगर कसे याबाबत मला माहीत नाही. कोणत्या बॅचचा अहवाल आला याबाबत मी

निश्चितपणे सांगू शकत नाही. आर. सी. एफ चे सॅम्पल अप्रमाणीत आल्याचे मी खोटे सांगत आहे, हे म्हणणे खोटे आहे. प्रयोगशाळेचा अहवाल चुकीचा आहे, हे म्हणणे खोटे आहे. आरोपी क्र.१ ने कोणताही गुन्हा केला नाही, हे म्हणणे खोटे आहे. शासनाला काम दाखविण्यासाठी खोटी तक्रार दिली, हे म्हणणे खोटे आहे.

**उलटतपासणी आरोपी क्र. २ तर्फे श्री. आर. व्ही. कोपार्डे विधीज्ञ.**

आरोपी क्र.२ व त्यांचे विधीज्ञ वारंवार पुकारले असता गैरहजर, उलटतपास मध्यंतरामुळे तहकूब करण्यात आला.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत.

KARLEKAR BHAGWAN MAHAJAN
Digitally signed by KARLEKAR BHAGWAN MAHAJAN
Date: 2026.03.07 16:50:27 +0530

**इस्लामपूर.** **(भगवान म. कारलेकर)**

**दिनांकः– ०७/०३/२०२६** **अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, इस्लामपूर.**

**मध्यंतरानंतर उलटतपासणी पुन्हा शपथेवर सुरु.**

आरोपी क्र. २ चे विधीज्ञ हजर. आरोपी क्र.२ गैरहजर.

आरोपी क्र. २ चे विधीज्ञांनी मुदत मिळणेबाबत अर्ज नि.क्र.३८ दाखल केला. निशाणी ३८ नामंजूर करण्यात आला. निशाणी १ वरील आदेशानुसार आरोपी क्र. २ विरुध्द अजामीनपात्र वॉरंट काढण्यात आले.

KARLEKAR BHAGWAN MAHAJAN
Digitally signed by KARLEKAR BHAGWAN MAHAJAN
Date: 2026.03.07 16:50:33 +0530

**इस्लामपूर.** **(भगवान म. कारलेकर)**

**दिनांकः–०७/०३/२०२६** **अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, इस्लामपूर.**